स्थापना
१ मे १९५७
Main Market\प्रसिध्दीपत्रक 2025-2026.docx6

# कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे

श्री छत्रपती शिवाजी महाराज मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे - ४११०३७
www.apmcpune.in / Email: admin@apmcpune.in, kubspune37@rediffmail.com

जा.क्र.प्रशा/स्थापत्य/मुख्य बाजार./पा.टाकी./ESR-GSR/प्रसिध्दीपत्रक/११८६/२०२६-२७     दि. १० /०८/२०२६

## प्रसिध्दीपत्रक

**विषय :- कृषी उत्पन्न बाजार समिती पुणेच्या मुख्य बाजार आवारात पुरवठा करणाऱ्या पिण्याच्या पाण्याच्या टाकीचे (ESR / GSR) साफसफाई करणे कामाबाबत...**

सक्षम ठेकेदारांना कळविणेत येते की, **कृषी उत्पन्न बाजार समिती पुणेच्या मुख्य बाजार आवारात पुरवठा करणाऱ्या पिण्याच्या पाण्याच्या टाकीचे (ESR / GSR) साफसफाईचे काम** करावयाचे आहे. सदर काम हे शासनाने आदेशित केलेल्या सर्व अटींचे काटेकोरपणे पालन करूनच करावयाचे आहे. काम करतेवेळी कोणत्याही कामगारांची वित्त / जिवितहानी / अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील. काम करावयाच्या ठिकाणी आपण स्वत: (ठेकेदार) यांनी संस्थेच्या स्थापत्य विभागाच्या संबंधित अधिकारी / कामाचे वास्तुशास्त्रज्ञ / कर्मचाऱ्यासोबत जाऊन, प्रत्यक्षरित्या कामाची पाहणी करुन तद्नंतरच आपल्या मोहरबंद दरपत्रके सादर करावीत. काम करतेवेळी कोणत्याही अटीचा भंग झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत ठेकेदाराची राहील.

तरी सदर कामाची मोहरबंद दरपत्रके **दिनांक-१८/०८/२०२६** अखेर स्थापत्य विभाग कार्यालयात सादर करावीत. सादर झालेली मोहरबंद दरपत्रके शक्य झाल्यास त्याच दिवशी अथवा **दिनांक-१८ /०८/२०२६** रोजी उपस्थित ठेकेदारांसमोर उघडण्यात येतील, कोणतेही अथवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा हक्क कृषी उत्पन्न बाजार समिती पुणेने राखुन ठेवला आहे, याची नोंद घ्यावी.

सदरचे (www.apmcpune.in) प्रसिद्धीपत्रक मुख्य कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर व बाजार समितीच्या संकेतस्थळावर दर्शविणेत येत आहे.

सचिव
कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे



Scanned with OKEN Scanner